## वेगवेगळया ३ मनुष्य मिसींग प्रकरणांचा तपास करुन् छडा लावण्यात यश सामाजिक सुरक्षा विभागाची कामगिरी

सामाजिक सुरक्षा विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे यांनी व त्यांचे कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी श्री. भानुप्रताप बर्गे सहा पोलीस आयुक्त, गुन्हे -२ यांचे मार्गदर्शनाखाली कौशल्यपुर्ण व जलदगतीने तपास करुन एक वर्षापासुन मुंढवा परिसरातुन हरविलेल्या महिलेचा विजापुर व सांगली येथे जावुन तपास करुन तिला ताब्यात घेवुन तिचे पालकांचेकडे सुपूर्द करण्यात आले.

सांगोला पोलीस स्टेशन मनुष्य मिसींग रजिस्टर नंबर ६१/२०१८ मधील मिसींग व्यक्ती विशाल आप्पासाहेब जाधव रा. सांगोला याचा तपास करुन तो सांगली येथे मिळुन आल्याने त्यास सांगोला पोलीसांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव सुपूर्द करण्यात आले आहे.

दिनांक १९/०३/२०१९ रोजी मिळालेल्या माहिती वरुन दार्जिलींग पश्चिम बंगाल येथील एक महिला जानेवारी २०१९ पासुन हरविली होती. तिचा कसोशिने तपास करुन ती सध्या तळेगाव दाभाडे येथे असल्याचे माहिती मिळताच जलद हालचाली करुन तिला तळेगाव दाभाडे येथुन ताब्यात घेवुन सरंक्षणकामी रेस्क्यु फौंडेशन हडपसर पुणे येथे ठेवण्यात आले असुन दार्जिलींग जिल्हयातील प्रधाननगर पोलीस स्टेशनचे पोलीसांना माहिती देण्यात आलेली आहे.

सामजिक सुरक्षा विभागाकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा झेंडे व महिला पोलीस उप निरीक्षक योगिता कुदळे, कर्मचारी नामदेव शेलार, रमेश लोहकरे, राजेंद्र कचरे, ननिता येळे, किरण अब्दागिरे, निलेश पालवे, यांनी तपास करुन एका आठवडयामध्ये तीन वेगवेगळया मिसींग प्रकरणांचा छडा लावण्यात यश प्राप्त केलेले आहे.